# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## दिनांक २७/०८/२०२४ (मंगळवार) दुपार

---

### पोस्टे केळवद हद्दीतील पारधी बेडा तिडंगी येथे अवैधरित्या मोहाफुल गावठी दारू काढणाऱ्या इसमांवर कायदेशिर कार्यवाही

दि. २६/०८/२०२४ रोजी पारधी बेडा तिडंगी येथे मोहाफुल गावठी दारू गाळणाऱ्या इसमावर कार्यवाही करण्यात आली. अवैधरित्या मोहाफुल गावठी दारु काढणारे एकुण २ महिला व ०१ पुरूष **आरोपी नामे– रंजित उर्फ डोमी चंद्रपाल राजपूत वय ३४ वर्ष रा. पारधी बेडा तिडंगी ता. कळमेश्वर जि. नागपूर** हे मोहाफुल रसायन सडवा बाळगुन मोहाफुलाची गावठी दारूची रनिंग भट्टी काढताना मिळुन आले. आरोपींचे ताब्यातून एकुण मोहाफुल रसायण सडवा ४२०० लिटर किंमती ८४०००/–रु व मोहाफुल गावठी दारु ५०० लिटर किंमती २५०००/–रु व दारु गाळण्याचे साहीत्य प्लास्टीक ड्रम, जळाऊ लाकुड, रबर पाईप, जर्मन घमिले, स्टील झाकणी किंमती २२९००/–रु असा एकुण किंमती १३१९००/–रु. चा मुद्देमाल मिळून आल्याने मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला. २ महिला व ०१ पुरूष आरोपी विरुद्ध पो.स्टे केळवद येथे कलम ६५ (ई), (एफ), (सी), (ब) महाराष्ट्र दारुबंदी अधिनीयम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे केळवद येथील प्रभारी ठाणेदार सपोनि मंगला मोकासे, पोउपनि विलास गेडाम, ग्रेड पोउपनि अमरदीप कामठे, सफौ नागरे, किशोर ठाकरे, नापोशि होमेश्वर खडसे, पोअं. सैफुल्ला अहमद यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर